# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

( पूर्वीचे पुणे विद्यापीठ )

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

## परिपत्रक क्र. ३९६/२०२४

**संदर्भ :-** १. मा.व्यवस्थापन परिषदेच्या दिनांक ३० ऑगस्ट, २०२४ रोजीच्या सभेतील ठराव क्र.म:२७३/३००८२४.
२. THE ORDER BY THE HIGH COURT OF JUDICATURE AT BOMBAY BENCH AT AURANGABAD IN THE MATTER OF 931 WRIT PETITION NO.2486 OF 2024.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार सर्व संबंधितांना या परिपत्रकाव्दारे कळविण्यात येते की, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ परिसर, अहिल्यानगर उपकेंद्र व नाशिक उपकेंद्र येथे कोणत्याही स्वरुपाच्या सभा, बैठका, आंदोलने व तत्सम कार्यक्रम करण्यासाठी विद्यापीठ प्रशासनाची **किमान आठ दिवस** पूर्वपरवानगी घेणे आवश्यक आहे.

विद्यापीठ प्रशासनाच्या पूर्वपरवानगीशिवाय सभा, बैठका, आंदोलने व तत्सम कार्यक्रम/उपक्रम आयोजित केल्यास संबंधितांवर योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात येईल, याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

तसेच विद्यापीठ आवारामध्ये विविध संघटना, विद्यार्थ्यांच्या सभा, आंदोलने, धरणे, उपोषणे व पथनाट्य या अनुषंगिक यापूर्वी निर्गमित करण्यात आलेले विद्यापीठ परिपत्रक क्र.५९/२०१८, जा.क्र.एएन/१२७४, दि.२७/०३/२०१८ प्रमाणे सर्व नियम व अटी लागू राहतील.

गणेशखिंड, पुणे - ४११ ००७
जा.क्र. : एएन/5416
दिनांक : 30 DEC 2024

(प्रा.(डॉ.) ज्योती भाकरे)
प्रभारी कुलसचिव

**प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी :-**

१. मा.विभागप्रमुख, सर्व शैक्षणिक विभाग
२. मा.संचालक, सर्व प्रशाला
३. मा.शाखाप्रमुख, सर्व प्रशासकीय शाखा
४. मा.प्राचार्य, विद्यापीठाशी संलग्न सर्व महाविद्यालये
५. मा.संचालक, विद्यापीठाच्या मान्यताप्राप्त सर्व परिसंस्था

(१ ते ५ :) आपणास विनंती की, सदर परिपत्रकातील आशय संबंधितांच्या निदर्शनास आणावे.

६. मा.जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे.
७. मा.पोलीस आयुक्त, पुणे शहर, पुणे.
८. मा.पोलीस उपआयुक्त, विशेष शाखा, पुणे शहर, पुणे.
९. मा.वरिष्ठ पोलीस निरीक्षक, चतु:श्रृंगी पोलीस स्टेशन, पुणे.
१०. मा.अध्यक्ष/सचिव, सर्व संघटना.
११. मा.संचालक सुरक्षा, सुरक्षा विभाग, सा.फु.पु.वि., पुणे.